AC – 20/05/2025

Item No. – 5.50 (N) Sem-III 4(a)

**As Per NEP 2020**

# University of Mumbai

| Syllabus for<br>Basket of Marathi - OE<br>Vertical 3 | |
|---|---|
| Faculty of Arts | |
| Board of Studies in Marathi | |
| Second Year Programme | |
| Semester | III |
| Title of Paper | Credits |
| ग्रंथपरीक्षण : संकल्पना व प्रत्यक्ष लेखन | 2 |
| From the Academic Year | 2025-26 |

# Syllabus
# B.A. (Marathi - OE )
# (Semester - III)
## Title of Paper : ग्रंथपरीक्षण : संकल्पना व प्रत्यक्ष लेखन

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन** **(Description of the course) :** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० चे आंतरविद्याशाखीय उद्दिष्ट ध्यानात घेऊन, **मुक्त वैकल्पिक (Open Elective)** या स्तंभांतर्गत **तृतीय सत्रासाठी** मराठी विषयाची **'ग्रंथपरीक्षण : संकल्पना व प्रत्यक्ष लेखन' (श्रेयांकने २)** ही अभ्यासपत्रिका अध्ययनासाठी उपलब्ध आहे. **M1** आणि **M1-M2** या प्रारूपांतर्गत अध्ययन करणाऱ्या मानव्य विद्याशाखेतील सामाजिक शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सदर अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणे अपेक्षित आहे. वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थीही या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करू शकतात.<br>ग्रंथपरीक्षण हा ज्ञानव्यवहारातला महत्त्वाचा उपक्रम आहे. वाचकांना विविध ज्ञानशाखांमधील ग्रंथांकडे आकर्षित करणे, ग्रंथ वाचनास उद्युक्त करणे आणि ग्रंथांची ओळख करून देणे आदी कारणांसाठी ग्रंथपरीक्षण केले जाते. ग्रंथपरीक्षण हा केवळ साहित्यव्यवहार नसून व्यापक ज्ञानव्यवहार आहे. विविध नियतकालिके व वृत्तपत्रांमधून ग्रंथपरीक्षणे प्रकाशित केली जातात. वाचनव्यवहारासाठी ग्रंथपरीक्षणाची असलेली उपयुक्तता सर्वज्ञात आहे.<br>सदर अभ्यासपत्रिकेतील पहिल्या घटकात ग्रंथपरीक्षण ही संकल्पना, स्वरूप व पद्धतींचा परिचय करून देणे अभिप्रेत आहे. दुसऱ्या घटकात ललित साहित्यकृती आणि ललितेतर ग्रंथ परीक्षण तंत्रांची ओळख करून देणे अपेक्षित आहे. तसेच प्रात्यक्षिक स्वरूपातील ग्रंथ परीक्षणाचाही या घटकात समावेश केला आहे. या दोन्ही घटकांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथपरीक्षण कसे करावे याचे भान येईल आणि ते इतर ग्रंथांचे परीक्षण करण्यास सिद्ध होतील. सदर अभ्यासपत्रिका विद्यार्थ्यांची अभिरुची वृद्धिंगत करेल. त्यांच्यामध्ये ग्रंथपरीक्षणासाठी आवश्यक कौशल्ये व क्षमता विकसित होतील. ग्रंथपरीक्षणाशी संबंधित व्यावसायिक संधींना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी सक्षम होतील. |
| 2 | **Vertical :** | Open Elective |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 2 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |

| | | |
|---|---|---|
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |

| | |
|---|---|
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. ग्रंथपरीक्षण ही संकल्पना स्पष्ट करणे.<br>२. ग्रंथपरीक्षणाचे स्वरूप आणि पद्धतींचा परिचय करून देणे.<br>३. ललित साहित्यकृती व ललितेतर ग्रंथांच्या परीक्षणाची तंत्रे समजावून सांगणे.<br>४. ललित साहित्यकृती व ललितेतर ग्रंथांचे परीक्षण करण्याच्या क्षमता व कौशल्ये विकसित करणे. |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना ग्रंथपरीक्षण ही संकल्पना स्पष्ट होईल.<br>२. विद्यार्थ्यांना ग्रंथपरीक्षणाचे स्वरूप आणि पद्धतींचा परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना ललित साहित्यकृती व ललितेतर ग्रंथांच्या परीक्षणाची तंत्रे समजतील.<br>४. विद्यार्थ्यांमध्ये ललित साहित्यकृती व ललितेतर ग्रंथांचे परीक्षण करण्याच्या क्षमता व कौशल्ये विकसित होतील. |
| 9 | **अभ्यासक्रम घटक (Modules) :** |
| | **घटक - १ : ग्रंथपरीक्षण : संकल्पना व स्वरूप** |
| | अ) ग्रंथपरीक्षण संकल्पना, ग्रंथपरीक्षणाची पूर्वतयारी : वाचन, चिंतन, संदर्भशोध, वस्तुनिष्ठ दृष्टिकोन<br>आ) ग्रंथपरीक्षणाचे घटक : लेखकाचा परिचय, ग्रंथाचा परिचय, ग्रंथातील विचार / आशयसूत्रे यांचे विवेचन, ग्रंथाची मौलिकता, निष्कर्ष<br>(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक - २ : ग्रंथपरीक्षणाची तंत्रे आणि प्रत्यक्ष ग्रंथपरीक्षण** |
| | अ) ललित साहित्यकृती व ललितेतर ग्रंथांच्या परीक्षणाची तंत्रे<br>आ) ललित साहित्यकृती व ललितेतर ग्रंथाचे प्रत्यक्ष परीक्षण<br>(६० मिनिटांच्या एकूण १५ तासिका, श्रेयांकन १)<br>( सूचना : शिक्षकांनी महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या ललित साहित्यकृतीचे (किमान एक) व ललितेतर ग्रंथाचे (किमान एक) प्रत्यक्ष परीक्षण करून दाखवावे. तसेच हेच ग्रंथ बहिर्गत परीक्षेसाठी आधार म्हणून वापरावेत.) |
| 10 | **पाठ्य ग्रंथ (Text Books) : N.A.** |
| 11 | **संदर्भ ग्रंथ( Reference Books) :**<br>१. *ग्रंथसंवाद*, वि. शं. चौघुले, संजय प्रकाशन, पुणे, १९८६.<br>२. *व्यावहारिक मराठी*, ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९३.<br>३. *मराठी भाषिक कौशल्ये*, (संपा.) पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१८. |

| | | |
|---|---|---|
| | ४. *वाङ्मयीन निबंधलेखन*, रा. ग. जाधव, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८७. | |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination** : **60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : २० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / पुस्तक परीक्षण / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) | |
| **14** | **बहिर्गत परीक्षा (External Examination) : ३० गुण (वेळ : एक तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप** **(Format of Question Paper) :**<br>१. प्रत्येकी **१५** गुणांचे एकूण **तीन** प्रश्न विचारावेत. त्यांपैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही **दोन** प्रश्न सोडवावेत.<br>२. पहिले **दोन** प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. दोन्ही घटकांवर आधारित **१५** गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले **दोन** प्रश्न विचारावेत.<br>३. **तिसरा** प्रश्न हा घटक क्रमांक एक व दोनवर आधारित **१५** गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. प्रत्येक घटकावर दहा याप्रमाणे एकूण **वीस** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही **पंधरा** प्रश्न सोडवावेत. | |

| Sd/- | Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|---|
| **Sign of BOS Chairman**<br>**Dr. Satish Kamat**<br>**Board of Studies in Marathi** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Suchitra Naik**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Associate Dean**<br>**Dr. Manisha Karne**<br>**Faculty of Humanities** | **Sign of the Dean**<br>**Prof. Dr. Anil Singh**<br>**Faculty of Humanities** |